महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**

**प्रेषक :-**
कार्यालयाचे नाव :- **कार्यकारी अभियंता**
**कार्यालयीन पत्ता :-** अति उच्च दाब संवसु विभाग, लातूर म.रा.वि.पारेषण कं.मर्या. १३२ के.व्ही. सबस्टेशन परिसर प्लॉट क्रं. पी. २१ एम.आय.डी.सी.लातूर ४१३५१२
**संपर्क :-** (०२३८२) २२२२०८;O) **ई-मेल आयडी :-** ee2220@mahatransco.in
**CINNo. U40109MH2005SGC153646**




**जा.क्र.:काअ/अउदा/संवसु/विभाग/लातूर/मासं/** No - 0127 **दिनांक :** 3 FEB 2026

## जाहीर नोटीस

१. महापारेषण (अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था विभाग, लातूर) अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार म्हणून सन २०२६-२०२७ करीता विजतंत्री (Electrician) या ट्रेंडमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

२.सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या www.apprenticeshipindia.org http://apprenticeshipindia.gov.inapprenticeshipindia/opportunity या संकेतस्थळावर (अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था विभाग, लातूर) च्या खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर ऑनलाईन अर्ज सादर करणे गरजेचे आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक ११.०२.२०२६ रात्री ११.५९ पर्यंत राहील. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा शिकाऊ भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. विजतंत्री (Electrician) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमानुसार १ वर्षाचा राहील. ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक माहिती खालील अस्थापनेच्या नावे नोंदणी क्रमांकावर करण्यात यावी.

| आस्थापनेचा रजिस्ट्रेशन क्रमांक | ट्रेंड | एकूण |
|---|---|---|
| Location : E02172700258 | विजतंत्री (Electrician) | एकूण जागा (२६) |

१. शैषणिक अर्हता :-महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NTVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री या व्यावसायिक परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
२. विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागू राहील.
३. पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापनेकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनास बंधनकारक राहणार नाही. भरती प्रक्रियेचे ठिकाण अउदा संवसु विभाग, लातूर - म.रा.वि.पारेषण क.मर्या, १३२ के.व्ही सबस्टेशन परिसर, प्लॉट क्र. २१, एम.आय.डी.सी. लातूर - ४१३५१२.
४. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी आरक्षण शासनाच्या विविध नियमांनुसार लागू राहील.
५. ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी उत्तीर्ण गुणपत्रीका व आय.टी.आय. उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमूद केलेले नाव व आधार कार्डवर नमूद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करुन माहिती भरावी.
६. एस.एस.सी उत्तीर्ण गुणपत्र /प्रमाणपत्र व आय.टी.आय. उत्तीर्ण गुणपत्र / प्रमाणपत्र (चारही सेमिस्टरची) साक्षांकित प्रत व शाळा सोडल्याचा दाखला ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.
७. शिकाऊ उमेदवाराची सही, पालकाची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी.मार्क, आय.टी.आय. मार्क ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवारांच्या शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.
८. या भरती प्रक्रियेमध्ये जे उमेदवार त्यांच्या अर्ज परिपूर्णपणे वेबसाईटवर भरतील अशाच उमेदवारांचा तात्पूर्ती (Provisional) गुणवत्तेसाठी विचार केला जाणार असून, त्यामधील कागदपत्रे पडताळणी करिता गुणवत्तेतील फक्त (७८) उमेदवारांना अंतिम निवडीसाठी उपरोक्त कार्यालयीन पत्त्यावर ठिक सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहणेबाबत विजकीय संदेशादवारे सुचित करण्यात येईल. त्याचबरोबर त्या उमेदवारांनी आस्थापणा कोडवर नावनोंदणी केलेली आहे परंतू अंतिम निवडीसाठी बोलविलेले नाही त्यांची गुणवत्ता यादी त्यांच्या मेलवर उमेदवारांच्या माहिती करीता पाठविण्यात येईल, जेणेकरुन उमेदवारांकडून अधिकची चौकशी अथवा पत्रव्यवहार करावा लागणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

९. सदर प्रक्रियेमध्ये विभागाच्या कार्यक्षेत्रातील उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

१०. शिकाऊ उमेदवाराची भरतीप्रक्रिये दरम्यान शिकाऊ उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडून दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रदद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

११. शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मूळ प्रमाणपत्रांची सुस्पष्ट स्कॅन करुन योग्यरितीने ऑनलाईन (Online) अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१२. प्रशिक्षण घेऊ ईच्छिणा-या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कालावधीत कोणताही तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात पदविका/पदवी अभ्यासक्रमाण प्रवेश घेतलेला नसावा. वरील कागदपत्रें अपलोड न केल्यास नोंदणीधारकांना पुढील प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना ई-मेलद्वारे कळविण्यात येईल. तरी कोणीही महापोषण कार्यालयास भेट देवू नये, तसेच जाहिरातीमध्ये किंवा जाहिरातीच्या काही भागांमध्ये अंशत: बदल किंवा संपूर्ण जाहिरात रदद करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवत आहे. सदर बाबतीत कुठल्याही प्रकारचा अधिकचा पत्रव्यवहार व या अनुषंगाने कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. या भरतीमध्ये राजकीय दबाव आणल्यास सदर उमेदवारास भरती प्रक्रियेतून रदद करण्यात येईल याची नोद घेण्यात यावी.

१३. वयोमर्यादा १८ ते ३० वय वर्षे (मागासवर्गीयांसाठी ०५ वर्षे शिथिलक्षम).

१४. ऑनलाईन (Online) अर्ज सादर करताना उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वीत असणारा Email-ID व भ्रमणध्वनी क्रमांक कार्यन्वित नसल्यामुळे संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवारांवर राहील.

१५. दि. ११.०२.२०२६ नंतर ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवाराचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१६. आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांना ऑनलाईन अर्जासोबत जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्या शासकीय नियमाप्रमाणे आरक्षण संबंधित कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१७. शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्ता होत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१८. निवड झालेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्यचिकित्सालय यांच्याकडून वैद्यकीय दाखला देणे बंधनकारक आहे. तसेच निवड झालेल्या प्रत्येक उमेदवाराने (पोलिस पाटील, मुख्याध्यापक, नगरसेवक, सरपंच यांच्या स्वाक्षरीचे) चारित्र प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१९. कागदपत्रे तपासणी किंवा शिकाऊ उमेदवार म्हणून हजर होण्याकरिता कोणत्याही रक्कमेची पुर्तता कंपनी देणार नाही.

२०. प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही निवासव्यवस्था कंपनीकडून मागणी करता येणार नाही.

(आफताब खान)
**कार्यकारी अभियंता**
**अउदा संवसु विभाग, लातूर**